शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास, सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. मान्यता -२०१३ /(८१/१३) /तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १५ मे,२०१३.

**संदर्भ:-** संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/ २०१३/२६७, दिनांक ८.५.२०१३.

**प्रस्तावना:-** शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनातील नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनातील नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट- **I(A), I(B), II(A), II(B), III(A), III(B), III(C), III(D), IV(A), IV(B), V, VI, VII, VIII, IX** मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ करणे व अतिरीक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.(शासकीय संस्था वगळून)

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील .सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता वर नमुद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा

लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे .

५) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवीका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) संस्थने अभ्यासक्रम चालविण्यास पुर्ण वेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रीक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे .तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन, व भत्ते इत्यादी बावत तसेच विद्यार्थ्यांकडुन शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा.प्रयोगशाळा, वाचनालय, क्लासरुम इ.) करणे आवश्यक आहे.

सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा .सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) सदर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिलेल्या ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले असतील तसेच ज्या संस्थांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे अशा संस्थांना मान्य झालेल्या अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत राबविण्यात येणारी फी-प्रतिपुर्तीची योजना लागू राहणार नाही. या अटीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी

१५) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विजय चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालकामार्फत)
४. संबंधित संस्था (संचालकामार्फत)
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी :-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक),भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.

Government Resolution No. Approval-2013/(C.R 81/13)/TE-5, dt-15/5/2013.

Annexure I(A) New Course/ Increase Intake

| Sr. No. | Inst Code | Institute Name | District | Program | Shift | Course Name | Course Start Year | Intake 2012-13 | Intake 2013-14 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 65 | 6419 | Nutan Maharashtra Vidya Polytechnic,Pune | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2005 | 90 | 120 |
| 66 | 6420 | Shikshan Prasarak Mandal's Polytechnic,Solapur | Solapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2013 | 0 | 120 |
| 67 | 6422 | Bharati Vidyapeeth's Institute of Technology, Palus, Sangli | Sangli | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular First Shift | Electrical Engineering | 2013 | 0 | 60 |
| 68 | 6429 | Vidya Vikas Pratishthan Polytechnic, Solapur | Solapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Electrical Engineering | 2013 | 0 | 60 |
| 69 | 6435 | Zeal Education Society, Dnyanganga Polytechnic, Narhe Tal. Haveli, Pune | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Civil Engineering | 2013 | 0 | 60 |
| 70 | 6435 | Zeal Education Society, Dnyanganga Polytechnic, Narhe Tal. Haveli, Pune | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular First Shift | Electrical Engineering | 2013 | 0 | 60 |
| 71 | 6443 | Shanti Education Society, A.G. Patil Polytechnic Institute, Solapur | Solapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2008 | 120 | 180 |
| 72 | 6446 | Kai. Amdar Bramhadevdada Mane Shikshan Va Samajik Pratishthan,Bramhadevdada Mane Polytechnic, Belati, Noth Solapur | Solapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2013 | 0 | 120 |
| 73 | 6449 | Marathwada Mitra Mandal's Polytechnic, Pune | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Automobile Engineering | 2013 | 0 | 60 |
| 74 | 6449 | Marathwada Mitra Mandal's Polytechnic, Pune | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2013 | 0 | 60 |
| 75 | 6451 | Samarth Rural Education Institute, Samarth Polytechnic, Bangarwadi, Belhe | Pune | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2013 | 0 | 120 |
| 76 | 6468 | Swami Vivekananda Shikshan Sanstha, Dr. Bapuji Salunkhe Institute Of Engineering & Technology,Kolhapur | Kolhapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Civil Engineering | 2013 | 0 | 60 |
| 77 | 6468 | Swami Vivekananda Shikshan Sanstha, Dr. Bapuji Salunkhe Institute Of Engineering & Technology,Kolhapur | Kolhapur | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2013 | 0 | 60 |
| 78 | 6473 | Shri. Venkateshwara Shikshan Sanstha's Nanasaheb Mahadik Polytechnic Institute, Peth | Sangli | Post S.S.C. Diploma in Engineering (Polytechnics) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2012 | 60 | 120 |